# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक १४/०३/२०२५ (शुक्रवार) दुपार

---

**अवैध दारू, अंमलीपदार्था बाबत, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह बाबत कारवाई नागपुर ग्रामीण**

**अवैध दारू,अंमलीपदार्था बाबत, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह कारवाई बाबत नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांची विशेष मोहीम**

**अवैध दारू बाबत ९१ गुन्हे नोंद ,एकुण १३,०७,५१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त**

**अंमलीपदार्थ सेवन करणाऱ्या ४ आरोपीविरूध्द कारवाई ,४१ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस**

होळी, रंगपंचमी सणोउत्सोव संदर्भात नागपुर ग्रामीण जिल्हयात कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला असुन सणोउत्सोव दरम्यान काही अनुचित प्रकार घडणार नाही याकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी गंभीर दखल घेवुन सातत्याने अवैध धंदयावर कारवाईचे आदेश दिले आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत **दिनांक** १३/०३/२०२५ रोजी **दारूबंदी कायदाअंतर्गत तसेच एनडीपीएस कायदयान्वये, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह** कारवाई बाबत विशेष मोहीम राबविली असुन सदर मोहीमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखा यांच्या सह नागपुर ग्रामीण जिल्हयांतील सर्व पोलीस स्टेशननी अवैध दारू बाबत कारवाई करून गुन्हे दाखल केले आहे. सदर कारवाईत अवैध दारूबाबत महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये **९१ गुन्हे नोंद करण्यात आले** असुन सदर कारवाईत **१,१८,८९० मि.ली. देशी दारू , ४,२०३ लिटर मोहाफुल दारू, ८,८८० लिटर मोहाफुल सडवा , ८२,२१० मि.ली विदेशी दारू, इतर साहीत्यासह १ मोटर सायकल, १ चारचाकी वाहन असा एकुण १३,०७,५१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायदयाअंतर्गत ९१ गुन्हे दाखल केले आहे.**

**सदर मोहीमेअंतर्गत दिनांक १३/०३/२०२५ रोजी** सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ४ **अरोपीतांविरूध्द एनडीपीएस कायदया** अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच मदयपान करून वाहन चालविणाऱ्यांवर **एकूण ४१ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस करण्यात आल्या आहेत.**